महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

वर्ष ६७ वे, अंक दुसरा-तिसरा

आषाढ १९४६ ते मार्गशीर्ष १९४६
जुलै ते डिसेंबर २०२४

## ‘छत्रपती शिवाजी महाराज आणि बृहन्महाराष्ट्र’ विशेषांक

## संपादक मंडळ

डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)
माधव रामराजे चौसाळकर
डॉ. शैलजा जोशी
मीना जहागिरदार
व्यंकटेश कुलकर्णी
डॉ. गायत्री शिरोळे

**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. : 32307/79

**कार्यवाह**
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.
**भ्रमणध्वनी :** ७८४२८५३९८४ / ९२९३५०५०३९
(संपर्क : सायंकाळी ५ ते ८) अन्यवेळी लिखित संदेश पाठवावे.

**प्रकाशक**
डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क :** म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षांची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. डॉ. शैलजा जोशी - ९२९३५०५०३९
संपर्कासाठी : MAIL ID : mspaphyd@gmail. com

वार्षिक वर्गणी रु. ४००/- स्पीड पोस्ट सह रु. ६००/-
(एका वर्षातील सर्व अंक स्पीड पोस्टने हवे असल्यास एक वर्षाची वर्गणी)

पंचधारा वर्गणी Marathi Sahity Parishad
IDBI Bank, Sultan Bazar, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125 IFSC Code – IBKL0000594
या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. ४००/-
तीन वर्षाची वर्गणी रु. १०००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. ४०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती
या अंकाचे मूल्य : रु. २५०/-
टपाल खर्च : रु. ५०/-

अक्षरजुळणी आणि मुखपृष्ठ : अमोघ आर्ट्स, एरंडवणे, पुणे ४११००४.

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या अंकात प्रकट झालेल्या मतांशी आणि निष्कर्षांशी मंडळ सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


संपादकीय ........................................................................ ५

राजमाता जिजाबाई .................................... मंजरी ताम्हनकर .................... ९

शिवराज्याभिषेक :
हिंदवी स्वराज्य स्थापनेचा सुवर्णक्षण ................ डॉ. गीता काटे .................... १९

छत्रपती शिवाजी महाराज आणि बेंगळुरू ............ डॉ. अर्चना मुकुंद अचलेरकर .... २७

शिवराज्याभिषेक : गोव्यासह आंतरराष्ट्रीय
इतिहास प्रभावित करणारे तेजस्वी पर्व ............... डॉ. विनय मडगांवकर ............ ३१

छत्रपती शिवाजी महाराजांचा
दक्षिण दिग्विजय : इ. स. १६७६-१६७८
मोहिमेतील यशस्वी युद्धनीती, कौशल्य
आणि स्वराज्य विस्तार ................................ विक्रमसिंह ज. मोहिते ............ ४३

मराठ्यांना झुंजवणारा वेल्लोरचा किल्ला............. श्री. महेश तेंडुलकर .............. ५१

शिवछत्रपतींची महाराष्ट्राबाहेरील पत्रे ................. डॉ. अनुराधा कुलकर्णी........... ५५

पराक्रमी छत्रसाल ..................................... डॉ. विद्या देवधर ................. ६४

तंजावर मराठा साम्राज्य
विद्वान सरफोजीराजे - २ ............................. विक्रमसिंह ज. मोहिते ............ ७०

छत्रपती शिवाजी महाराज - श्रीमंत योगी............. मीना खोंड ........................ ७८

छत्रपती शिवाजी महाराज आणि
कोकण किनारपट्टीचा कोळी समाज .................. अर्चना महेश देशमुख ............ ८८

सुरतेवरील हल्ला : मोगलांना दिलेला शह ........... व्यंकटेश कुलकर्णी ............... ९३

माळव्यामध्ये शिवशाही .............................. सीमा जयंत भिसे ................. ९७

मराठेशाहीचा पूर्व भारतातील
राज्यविस्तार आणि सांस्कृतिक योगदान............. सुधीर थोरात ................... १०३

शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका ............... अपर्णा कुलकर्णी .............. ११४

धर्मच्छलाच्या भीषण नाट्यात होरपळलेल्या
एका गावाची कहाणी : 'तांडव' ...................... प्रा. विनायक ल. बापट ....... १२०

शिवशाहीवर आधारित मराठी कथा :
ऐतिहासिक तथ्यांच्या आधारे विश्लेषण ............. प्रा. नवसो विश्राम परब ....... १२८

**वेध विदेशी भाषांचा – साहित्याचा**

कदम कदम बढाये जा... ............................. चिन्मय रहाळकर .............. १३६

**ग्रंथपरीक्षण**

१) भुईचा लळा लावणाऱ्या कविता -
भुईचे लळासे .................................. डॉ. शरद ठाकर ............... १४३

२) आयी चांदनी रात.... .......................... अरुण डवलेकर ............... १४९

**संस्थावृत्त**

१) विदुषी मालिनीताई राजुरकर
विशेषांक प्रकाशन ............................. अरुण डवलेकर ............... १५५

२) दत्तोपासक संत सर्वज्ञ दासोपंत
पुस्तक प्रकाशन सोहळा....................... अरुण डवलेकर ............... १५७

३) अभिजात मराठी सन्मान सोहळा ............. गिरीश श्रीपाद मोंडकर ........ १५९

स्वागत नव्या पुस्तकांचे ................................................................ १६२

लेखक परिचय .............................................................................. १६३

# धर्मच्छलाच्या भीषण नाट्यात होरपळलेल्या एका गावाची कहाणी : 'तांडव'



प्रा. विनायक ल. बापट

काही कादंबऱ्या या आपल्या वैशिष्ट्यपूर्णतेमुळे एकूण कादंबरी वाङ्मयप्रवाहात स्वतःची वेगळी नाममुद्रा उमटवणाऱ्या असतात. महाबळेश्वर सैल यांची 'तांडव' ही कादंबरी गोमंतकीयच नव्हे, तर एकूण मराठी कादंबरीच्या विश्वात मैलाचा दगड ठरावी अशी कादंबरी आहे. काळाचा एक विस्तृत पट तर या कादंबरीला लाभलाच आहे, त्याचबरोबर खूप मोठा अवकाश कवेत घेणारी अशी ही कादंबरी आहे. एक गावच या कादंबरीत आपल्यासमोर नायक म्हणून उभा राहतो. सामूहिकतेचं एवढं सूक्ष्म भान व्यक्त करणारी दुसरी एखादी कादंबरी क्वचितच मराठीत लिहिली गेली असेल. एक अस्सल ग्रामसंवेदना व्यक्त करणारी कादंबरी म्हणूनही या कादंबरीकडे पाहता येईल. एकूणच बहुविध वैशिष्ट्यांना आपल्यामध्ये समाविष्ट करून घेत आजपर्यंतच्या मराठी कादंबरीला अपरिचित असलेलं असं विश्व महाबळेश्वर सैल यांनी या कादंबरीतून जिवंत केलं आहे.

१५१०मध्ये पोर्तुगीजांनी गोवा बेट जिंकून घेतलं. आजपर्यंत गोमंतक भूमीने स्वकीयांच्या व परकीयांच्या अनेक राजवटी अनुभवल्या होत्या. राजवट बदलली तर जनतेच्या दैनंदिन जीवनात त्यामुळे कोणताच फरक पडत नसे. त्यामुळे राजकीय घडामोडींची म्हणावी तेवढी काळजी सामान्य जनतेने आजपर्यंत कधीच केली नव्हती. पण अल्फान्सो डी अल्बुकर्क याने गोवा बेट जिंकून घेतलं आणि त्यानंतर पोर्तुगीजांची जी राजवट गोव्यात स्थापन झाली ती सर्वस्वी वेगळी होती. एका हातात तलवार आणि एका हातात क्रॉस घेऊन ते आले होते. धर्मप्रसाराचं एक आत्यंतिक खूळ डोक्यात घेऊन ही राजवट आली होती. ख्रिस्ती धर्म वाढवण्याची एक आसुरी महत्त्वाकांक्षा ते उराशी बाळगून आले होते. आपले ईप्सित साध्य करण्यासाठी त्यांची कोणत्याही थराला जाण्याची तयारी होती. येथील पारंपरिक धर्म आणि संस्कृती यांचं समूळ उच्चाटन करून सर्वत्र ख्रिस्ती धर्म पसरवण्याचं एक वेड त्यांनी डोक्यात घेतलं होतं. आपली राजवट स्थापन झाल्यानंतर अत्यंत शिस्तबद्धपणे त्यांनी आपल्या या कामाला सुरुवात केली. आपलं ध्येय साध्य करण्यासाठी त्यांनी

येथील प्रजेवर अनन्वित अत्याचार करण्यास सुरुवात केली. या अन्याय-अत्याचारातूनच पाचशे वर्षांपूर्वी ‘आदोळशी’ या गावची कशी धूळदाण उडाली, हा संपूर्ण गाव या जबरदस्तीच्या, धर्मपरिवर्तनाच्या वणव्यात कसा होरपळून निघाला याचं हृदयद्रावक वर्णन ‘तांडव’ या कादंबरीत आलं आहे.

‘आदोळशी’ हा अघनाशिनीच्या म्हणजे आता जुवारी या नावाने ओळखल्या जात असलेल्या नदीच्या तीरावर वसलेला, निसर्गाने चहुबाजूंनी वेढलेला एक नितांतसुंदर गाव. पाचशे वर्षांपूर्वीच्या या गावच्या वर्णनावरून आपणाला त्या काळाची आणि तत्कालीन लोकजीवनाची परिपूर्ण कल्पना येते. शेती आणि बागायती हा येथील लोकांचा महत्त्वाचा व्यवसाय. अनेक जाती-जमातींत विखुरलेला असा तत्कालीन समाजव्यवस्थेच्या चौकटीतील असा हा गाव! लोकांच्या धार्मिक श्रद्धा अत्यंत बळकट असलेल्या दिसतात. माती आणि संस्कृती यांना सर्वस्वाने कवटाळत आपला जीवनव्यवहार चालवणारा असा हा गाव! पाखल्यांनी (पोर्तुगीजांनी) गुळाच्या पाकात घोळवलेली खायला दिलेली फळं खाल्ली म्हणून बाटगा ठरवलेल्या गणबाचं गावात झालेलं आगमन, गाव पापात पडेल म्हणून लोकांनी त्याला गावातून हाकलणं, देवाने स्नान करायच्या तळीत त्याने जीव देणं, सदा नायकाने त्याला गावाच्या सीमेच्या आत पुरणं ही या कादंबरीची सुरुवात आणि इनक्विझिशनच्या (धर्मपरीक्षण सभा) भीतीने पळून गेलेल्या लवू व गौरीचं अत्यंत दयनीय अवस्थेत आपल्या हरवलेल्या मुलांच्या शोधात गावात पुन्हा आगमन व आपल्याच घरात चोरासारखं येऊन झोपलं असता, उद्या काय करावं? या विवंचनेत त्यांचं तळमळणं या बिंदूला ही कादंबरी संपते. पण या दोन बिंदूंमधील गोठलेला काळ म्हणजे संपन्नतेतून मरणकळा प्राप्त झालेल्या गावची ही कथा आहे.

आसुरी पद्धतीने राज्य करणारे पोर्तुगीज राज्यकर्ते व त्यांच्या संरक्षणाखाली मुक्तहस्त मिळालेल्या धर्मप्रसारकांनी जबरदस्तीने घडवून आणलेल्या धर्मांतराच्या घटनेभोवती या संपूर्ण कादंबरीची निर्मिती झाली आहे. धार्मिक उन्माद, धर्मवेडेपणा आणि त्याला प्राप्त झालेलं राजकीय पाठबळ काय घडवू शकतं याचं अंगावर शहारे आणणारं प्रत्ययकारी दर्शन कादंबरीचे लेखक महाबळेश्वर सैल यांनी या कादंबरीतून घडवलं आहे. फादर सिमॉव पिरीससारख्यांनी सुरुवातीच्या काळात, येशू ख्रिस्ताच्या मूळ तत्त्वांना अनुसरून प्रेमाने हृदयपरिवर्तन करून धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला; पण एखाद-दुसरा अपवाद वगळता त्याला कोणी फारसा प्रतिसाद दिला नाही. जेव्हा कापितांव दियोग बार्रेत, शेफ कामील रिबेयन हे सैन्याधिकारी मुख्य पाद्री पावलु कुलासूसोबत सहा महिन्यांत संपूर्ण गाव ख्रिस्ती करण्याचं स्वप्न घेऊन गावात आले व गावातील वेताळाच्या

देवळातील वेताळाची मूर्ती काढून टाकून त्या देवळातच स्थानापन्न झाले, तेव्हापासून गावच्या दुर्दशेला सुरुवात झाली. त्यांनी धर्मपरिवर्तनासाठी साम, दाम, दंड, भेद या सर्व नीती वापरल्या, पण स्वखुशीने धर्मपरिवर्तन करण्यास कोणीच तयार नव्हता. कारण पारंपरिक लोकसंस्कृतीशी, धर्मकल्पनांशी, चाली-रीतींशी, गावच्या परंपरांशी, समजुतींशी एकरूप झालेला तो समाज होता. या एकरूपतेची असंख्य उदाहरणं या कादंबरीत विखुरली आहेत. शकून, अपशकून, दंतकथा, संकेत, दैवी कोप, देवचारासारख्या अमानवी शक्तीची अस्तित्व अशा अनेक गोष्टींतून या लोकांचे माती आणि संस्कृती यांच्याशी असलेलं नातं दिसून येतं. गळ्यात जू असताना औताला जुंपलेला बैल वाघानं मारणं हा त्यांना मोठा अपशकून वाटत होता, तर वाटेत आडवी आलेली कुर्ली (खेकडा) घरी आणू नये; कारण ती चेटकिणीच्या रूपात घरात शिरते हा त्यांचा समज होता. गावच्या सर्व परंपरांचे ते अगदी कसोशीने पालन करीत होते. गावात दोन मोठे स्तन असलेली पाषाणाची मूर्ती होती. ती पूतना आहे. दर अमावास्येला तिच्या स्तनातून विष स्रवतं आणि मोठाल्या नखांचं एक घुबड मध्यरात्री येऊन ते विष ओढून घेतं. ते घुबड गावात आहे तोवर गावाला भय नाही. या दंतकथेवर त्या लोकांची पूर्ण श्रद्धा होती. हा पापभीरू समाज नुसत्या हृदयपरिवर्तनातून आपला पारंपरिक धर्म सोडणार नाही याची जाणीव झाली, तेव्हा या धर्मवेड्या पोर्तुगीजांनी त्यांच्या मर्मावर घाव घालायला सुरुवात केली. गाव ही संकल्पनाच शेती या घटकाशी व एकूणच शेतीकेंद्रित व्यवस्थेशी जोडलेली असते. त्यांनी यावरच आघात करण्यास सुरुवात केली. तत्कालीन गोव्यात सामायिक शेतीची संकल्पना अस्तित्वात होती. या सामायिक शेतीचा वार्षिक लिलाव केला जात असे व भूमीहीन शेतकरी ही जमीन घेऊन कसत असत व आपला उदरनिर्वाह करीत असत. या सर्वांवर देखरेख करण्यासाठी त्या काळी गावकारी पद्धत अस्तित्वात होती व गावकारीमध्ये गावातील सर्व घटकांचे प्रतिनिधित्व असायचं. पोर्तुगीज राजकर्त्यांनी जबरदस्तीने गावची सामायिक शेती ताब्यात घेण्यास सुरुवात केली व ती जमीन जे ख्रिश्चन होतील त्यांना देण्याचं घोषित केलं. पण तरीही एखादा किरकोळ अपवाद वगळता कोणी ख्रिस्ती व्हायला तयार नव्हतं. मग त्यांनी नवीन हुकूम काढला. कोणत्याच हिंदूला गडी-मनाय लावून शेती करता येणार नाही. स्वतःची शेती स्वतःच कसावी लागेल. हिंदू जमीनदारांसाठी शेतसारा होता त्यापेक्षा तो कितीतरी पटीने वाढवला. आई-वडील गेल्यास मुलाला अनाथ ठरवून त्याचं सक्तीने धर्मांतर करू लागले. नंतर त्यांनी लोकांच्या धार्मिक विधींवर, चालीरीतींवर निर्बंध आणले व शेवट लोकांच्या श्रद्धास्थानांवर म्हणजेच मंदिरांवर घाव घालण्यास सुरुवात केली आणि गाव दुभंगत गेला.

शेतकरी हा जमिनीशी जोडलेला असतो आणि या वर्षानुवर्षे चालत आलेल्या ग्रामसंस्कृतीचं तो कसोशीने पालन करीत असतो. पण आजपर्यंत कोणत्याच शेतकऱ्यांना कधी न पडलेला 'जमीन की संस्कृती?' असा यक्षप्रश्न गावकऱ्यांसमोर निर्माण झाला. जमीन धरून ठेवायची असेल तर धर्म आणि संस्कृती यांचा त्याग आवश्यक होता आणि संस्कृती हवी असेल तर जमीन सोडावी लागणार होती. ज्यांना कोणत्याही कारणाने असेल; जमिनीशी असलेलं नातं तोडणं अशक्य झालं, त्यांनी धर्म बदलणं नाखुशीने पण काळजावर दगड ठेवून मान्य केलं आणि ज्यांना आपल्या प्रथा, परंपरा, देव आणि धर्म मोठा वाटला, त्यांनी देव माथ्यावर मारून आणि जमिनीशी जोडलेली नाळ तोडून गावातून पलायन केलं. पण हे सगळं का करावं लागलं, याची जी अत्यंत सूचक शब्दांत आणि कलात्मकतेचा पदर जराही ढळू न देता लेखकाने कारणमीमांसा केली आहे, त्यामुळे खरंतर या कादंबरीचं वाङ्मयीन मूल्य केवढ्यातरी पटीने वाढलं आहे. आपली पारंपरिक भोळसट प्रवृत्ती, कोती मनोवृत्ती, आपली लालसा, हाव, अहंकाराची भावना, आपल्या विकृत धर्मकल्पना, जातीपातीत विखुरलेला आपला समाज आणि आपल्या लोकांना दुसऱ्याने जबरदस्तीने काही केलं तरी त्याला संरक्षण न देता स्वतःच त्याला आपल्यातून भ्रष्ट ठरवून बहिष्कृत करण्याची आपली प्रवृत्ती आणि पुन्हा आपल्यात घेण्याची कोणतीच व्यवस्था नसणं, मुळात धर्मशिक्षण आणि संघटितपणा यांचा आपल्यात असलेला अभाव या सर्व गोष्टी आपल्या धर्माच्या आणि संस्कृतीच्या नाशाला कशा जास्त कारणीभूत ठरल्या, हे लेखकाने अगदी नेमकेपणाने दाखवून दिलं आहे. या संदर्भात पहिल्यांदा पाकले जेव्हा गावात येतात त्या वेळचं लेखकाने केलेलं वर्णन आपल्या पारंपरिक मनोवृत्तीचं नेमकं दर्शन घडविणारं आहे. लेखक लिहितो, 'सगळ्या गावाला रान पेटल्यासारखी खबर पोहोचली होती. देऊळवाडीवरचे देवळी, गुरव, भोई, शिरवाडीवरचे नायक, घाण्यामाळावरचे लोहार, कुंभार, रायगाळीतलचे बामण सगळ्यांची भिऊन गाळण उडाली होती. ते शेतात, रानात, घरात आहे तिथेच लपून बसले होते. कोणीच पुढे येत धैर्याने त्यांचा सामना करण्याचा प्रयत्न केला नाही. आपणच जर बाटगा ठरवून एखाद्याला धर्मातून बहिष्कृत केलं नसतं तर त्यांना धर्मपरिवर्तन करणं एवढं सहजशक्य झालं नसतं. पण आपण नेमकं तेच केलं. आपण आपल्यातील क्षात्रतेज, स्वाभिमान, लढाऊ वृत्ती थोडीशी जरी जागृत ठेवली असती, तर अशी गावच्या गावं धर्मांतरित झाली नसती. आपणच थोड्याशा स्वार्थासाठी, अहंकारातून, द्वेषातून एकमेकांच्या चुगल्या केल्या नसत्या, तर अनेकांना ज्या मरणयातना भोगाव्या लागल्या, त्या भोगाव्या

लागल्या नसत्या'; हे अनेक घटना-प्रसंगांतून लेखकाने अगदी प्रत्यकारकरीत्या दाखवून दिलं आहे. इन्क्विझेशनच्या शिक्षा व त्या देण्याची पद्धती यांचं केलेलं वर्णन अंगावर शहारे आणणारं आहे. एकदा धर्मपरिवर्तन केल्यावर कोणी जर आपल्या अगोदरच्या धर्माचं चोरूनमारून पालन करत असेल तर त्यांना दोषी ठरवून या इन्क्विझेशनच्या समोर उभं केलं जात असे. धर्म बदलला तरी आपल्या श्रद्धा बदलणं या नवख्रिस्त्यांना एवढ्या सहजपणे शक्य नव्हतं. पण या श्रद्धांचं पालन केल्याची भयानक शिक्षा त्यांना सहन करावी लागत असे. या इन्क्विझेशनच्या नावाखाली किती नवख्रिस्त्यांना भयानक यातना सहन कराव्या लागल्या आणि मरणाला सामोरं जावं लागलं याची गणतीच नाही. पाचशे वर्षांपूर्वीची आणि आजच्या आधुनिक काळातील गावातील लोकांची मानसिकता समान आहे का? असा प्रश्न काही वेळा ही कादंबरी वाचताना निर्माण होतो. गावातील लोक समूहाने राहतात, त्यांचे व्यवहारही समूह मतानुसारच होतात. पण स्वतःवरील अन्याय अत्याचाराविरुद्ध पेटून उठण्यात ही समूहभावना कधीच जागृत झाल्याचं दिसत नाही. मग ते पोर्तुगीजकालीन गाव असो की शहरीकरणाच्या कचाट्यात सापडलेलं आधुनिक गाव असो. एकूणच ग्रामीण मानसिकतेविषयी गंभीर प्रश्न निर्माण करणारी आणि विचार करायला लावणारी ही कादंबरी आहे. अगदी आत्तापर्यंत आपल्या जिवाभावाच्या असलेल्या माणसाला एका क्षणात आपण कसा परका करतो याची असंख्य उदाहरणं या कादंबरीत सापडतात. अगदी नकळत्या वयातील मुलाने गाईचं मांस खाल्लं म्हणून त्याला बहिष्कृत करणारा आपला समाज बघितला की आपली आपणालाच कीव येऊ लागते. एखाद्या घरातील एखादा जबरदस्तीने ख्रिस्ती झाला तरी त्यांच्यासोबत त्या घरातील सर्वांनाच वाळीत टाकलं जात असे. त्यामुळे त्यांच्यासमोर ख्रिस्ती झाल्याशिवाय पर्याय शिल्लक राहत नसे. यासंदर्भात या कादंबरीतील एक पात्र देवराय शणै जे म्हणतो ते विचार करायला लावणारं आहे. धर्म वाचवण्यासाठी म्हणून देव घेऊन पळून गेलेला, पण सर्वस्व हरवल्याने आपल्या घराकडे परत आलेल्या रुद्र शणैला उद्देशून तो म्हणतो, ''मी घरून काहीतरी खायला आणलं असतं. पण मी झालोय ख्रिश्चन. पाय तेच, हात तेच, पाहणाऱ्या डोळ्यांच्या बाहुल्या त्याच. आता मी ख्रिश्चन झालो म्हणून माझा पाय नीट झाला की झालेल्यांचा मोडला? कुठे काहीच नाही. पण जेवणखाण मात्र तुटलं. मांडीला मांडी लावून बसत होतो, आता हात बोट लागलं तरी पाप. वेडेपणा सगळा.'' दुर्दैवाने आजही आपली मानसिकता बदललेली नाही. खरंतर हिंदू मानसिकतेचं खूप सुंदर विश्लेषण या कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने केलं आहे.

या संदर्भात जबरदस्तीने ख्रिस्ती झालेल्या या कादंबरीतील एका गावकऱ्यांचा त्याच गावातील हिंदू बांधवासोबत झालेला संवादही पाहण्यासारखा आहे. तो हिंदू म्हणतो, ''तुम्ही ख्रिस्ती झालात तरी अगोदरचे हिंदू आहात आणि आपल्या देवाचं रक्षण करणं ही तुमचीही जबाबदारी आहे.'' तेव्हा तो ख्रिश्चन झालेला गावकरी उद्वेगाने विचारतो, ''देव वाचवण्याची खबर आम्हांला सांगतोस तू, निळूभाव? देणार तुम्ही आम्हांला देवळात घुसून देव डोकीवर घ्यायला? तुम्ही आम्हाला गर्भागारात जायला देणार नाही, देवाला स्पर्श करू देणार नाही.'' तो उठला आणि चालायला लागला. जाताना तो रडत होता, ''आम्हांला फसवलं. तुम्हीच आता देव डोक्यावर मारून घ्या. कुठे नेऊन बसवायचा तो बसवा.'' ही त्या गावकऱ्यांच्या मनाची आर्तता आपल्या डोळ्यांत अंजन घालणारी आहे आणि भारतात धर्मांतरं का झाली याची कारणमीमांसाही करणारी आहे. जेव्हा गाव सोडून जायचा की धर्म बदलायचा, असा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा एक गावकरी म्हणतो, ''मी आजपर्यंत प्रत्येक काम देवाला प्रसाद लावून देव सांगेल तसेच करत आलोय. तेव्हा ही गोष्टदेखील आपण देव सांगेल तशीच करणार.'' तो देवळात जातो आणि देवळातील पुजाऱ्यांना म्हणतो, ''देवाला प्रसाद लाव आणि विचार मी ख्रिस्ती होऊ की नको?'' त्याला 'ख्रिस्ती हो' म्हणून प्रसाद होतो, तेव्हा तो म्हणतो, ''जेव्हा देवच ख्रिस्ती हो म्हणून सांगतो त्या धर्मात कशाला राहायचं?'' आपल्या धार्मिक कल्पना किती भोळसट होत्या आणि खऱ्या धर्माचं ज्ञान आपण सामान्य माणसापर्यंत पोहोचू दिलं नाही व म्हणून ज्या तथाकथित धर्ममार्तंडांनी धर्माचे अधिकार आपल्या हातात घेऊन कर्मकांडाच्या जंजाळात खरा धर्म बुडवला, तेच या धार्मिक छळास खऱ्या अर्थाने कारणीभूत आहेत, हे लेखकाने अत्यंत सूचकपणे सांगितलं आहे.

या कादंबरीतून तत्कालीन काळ अगदी प्रत्यकारकरीत्या चित्रित झाला आहे. या काळातील लोकांची नावं पाहण्यासारखी आहेत. सुखडा, म्हाबळू, पुतू, सातण, मर्तो, जोगू, रायण्णा, मुंगरू, देमू, बामू ही तत्कालीन पुरुषांची नावं तर म्हालकूम, विठाय, अंबी, केसर, आवडा ही बायकांची नावं तत्कालीन काळाला आपल्यासमोर जिवंत करतात. त्याचप्रमाणे त्या वेळचे साप चावल्यास झाडा घालण्यासारखा प्रकार, मातीच्या भांड्यात रांधणं आणि पेज हे महत्त्वाचं अन्न असणं, तारव्यातून होणारी वाहतूक, लंगोटीशिवाय पुरुषांकडे नेसायला दुसरं वस्त्र नसणं... या सर्वांतूनही तो काळ जिवंतपणे उभा राहतो. उत्पन्न मोजण्याच्या मापावरूनही तो काळ साक्षात उभा राहतो, चार सोलग्यांचा आठवो, दोन आठव्यांची पड, चार पडींचा कुडव, वीस कुडवांची खंडी, वीस खंडींचा कुंभ ही कोणतंही धान्य मोजण्याची पद्धत आजच्या

आधुनिक पिढीला ऐकूनही माहीत असण्याची शक्यता नाही. ख्रिश्चन झाल्यावर काय-काय करायचं नाही, याची जी यादी दिली आहे, ती पाहिल्यावर तत्कालीन पारंपरिक लोकजीवन कसं असेल याची सहज कल्पना येते. धर्मांतरित ख्रिस्त्यांनी देवळात जायचं नाही, दारासमोर अंगण ठेवायचं नाही, अंगणात तुळस लावायची नाही, दारापुढे केळीचं झाड लावायचं नाही, बायकांनी स्वयंपाक करण्याआधी आंघोळ करायची नाही, मुंज, गर्भाधान हे विधी करायचे नाहीत, गळ्यात काळे मणी घालायचे नाहीत, कपाळाला कुंकू लावायचं नाही, पुरुषांनी शेंडी ठेवायची नाही, लग्न करताना नारळ फोडायचा नाही, हळद लावायची नाही, ओटी भरायची नाही, शिमग्यात नाचायचं नाही. हा सर्व 'ना'चा पाढा पाहिल्यानंतर त्या वेळच्या या सर्व गोष्टी करणारं हिंदू गावजीवन कसं होतं हे आपल्या सहज लक्षात येतं.

एकूणच या कादंबरीतील काळ जरी पाचशे वर्षांपूर्वीचा असला, तरी एक अस्सल ग्रामीण संवेदना व्यक्त करणारी कादंबरी म्हणून आपणाला या कादंबरीकडे पाहावं लागतं. तसंच आजचं ग्रामजीवन व तत्कालीन ग्रामजीवन यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याच्या दृष्टीनेही ही कादंबरी खूप महत्त्वाची ठरते. एक गाव उद्ध्वस्त होण्याचं एक अगदी वेगळं कारण घेऊन ही कादंबरी आकाराला आली असल्यामुळे एकूण मराठी ग्रामीण कादंबरीच्या विश्वात वेगळी ठरावी अशी ही कादंबरी आहे.

प्रत्ययकारी भाषा हा या कादंबरीचा आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणून सांगता येतो. अगदी छोट्या छोट्या प्रसंगांतून तत्कालीन कालिक संवेदना यथार्थपणे व्यक्त करणारी या कादंबरीतील भाषा खूपच परिणामकारक ठरली आहे. कादंबरीतील अनेक संवाद लेखकाने प्रमाणबोलीत घेतले आहेत. ते स्थानिक भाषेत तसेच ठेवले असते तर या कादंबरीचं भाषिक मूल्य आणखी कैक पटीने वाढलं असतं. पण कदाचित गोव्यातील एकूण भाषिक पर्यावरण लक्षात घेऊन लेखकाने हा मार्ग स्वीकारला असावा. पण त्यामुळे कादंबरीच्या भाषिक सौंदर्याला ठेच पोचली आहे. काही म्हणी, वाक्प्रचार यांचा वापर अत्यंत खुबीने केला आहे. उदाहरणार्थ, 'पुढे गेलेली भागली आणि मागं राहिलेली गर्भार झाली.', 'उंदराच्या रागाने घराला आग', 'घुबडं नाचवण्याचा खुळा खेळ', ही त्यांची काही उदाहरणं म्हणून सांगता येतील. अन्वर्थक प्रतिमांची नटलेली वाक्यं, सूचकता व्यक्त करणारी वाक्यं अशा वाक्यांमुळे या कादंबरीची वाचनीयता अधिक वाढली आहे. पुढील काही वाक्यं याची उदाहरणं म्हणून सांगता येतील.

'अंगावरून काटेरी चाक फिरत जावं तसा दिवस गेला.'


'तुमच्या आगीला भिऊन तिनं पाणी जवळ केलं असेल.'

'आभाळातून चालतात, पायाखालचे कावळे मरून पडलेले दिसत नाहीत.'

'मातीतून काळापर्यंत पोचलेली मुळं तोडून टाकीत एक दुःखाचा समुद्र काळजात दाबून घेत ते रात्रीला गावातून बाहेर पडून डोंगराची चढण चढत होते.'

'हे भांडण धर्माचं कुठे? भांडण आहे आडमुठ्या, आगलाव्या माणसांमधील.' एकूणच एक आशयगर्भ कादंबरीचा आशय समर्थपणे पेलण्यासाठी तेवढीच समर्थ शब्दकळा कादंबरीला लाभली आहे. आजपर्यंत मराठी माणसाला अपरिचित असलेला विषय ही कादंबरी आपल्यासमोर घेऊन आली असून, धर्म, संस्कृती यांची चिकित्सा करताना आज जगण्यासाठी मानव्याची खऱ्या अर्थाने आवश्यकता आहे, हे ही कादंबरी अधोरेखित करते आणि म्हणूनच या कादंबरीची जी अर्पणपत्रिका बुद्ध, येशू आणि गांधींच्या नावे आहे, ती अधिक अन्वयार्थक वाटते.

■


# पंचधारा

**माध्यमांतर आणि प्रकारांतर विशेषांक**

**वर्ष ६५ वे, अंक दुसरा**

**जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३**

**अधिक श्रावण ते भाद्रपद १९४५**

विषय : माध्यमांतराच्या संशोधनातील अडचणी, काव्य ते गीत - सर्जनाचा चिद्विलास, मराठी कादंबरीचे चित्रपट माध्यमांतर, पेशवाईवर आधारित ऐतिहासिक कादंबऱ्यांचे माध्यमांतर, ग्रामीण कादंबऱ्यांचे माध्यमांतर, लोककला व लोकसमजूतींवर आधारित कादंबऱ्यांचे माध्यमांतर, महानंदाचे माध्यमांतर नाटक गुंतता हृदय हे, कादंबरी ते वेबसेरिज, चरित्र-आत्मचरित्रात्मक साहित्यकृतीचे माध्यमांतर, चरित्र ते चित्रपटनिर्मिती एक आनंददायी अनुभव, नाटक ते सिनेमा माध्यमांतर, कथांचे माध्यमांतर, व्हिक्टर ह्यूगोच्या साहित्याचे माध्यमांतर.

**पृष्ठे : १५६** **किंमत : २००/- रु.**